# दिव्य सूक्त

भगवंताचे नाम भगवंताप्रमाणेच रसमय आहे.
ही गॉड थेरपी आहे. ही परमोत्कृष्ट थेरपी आहे.

~ बाबा मुक्तानंद

नामसंकीर्तनात रस निहित असतो,
जो भक्तिरस आहे.

~ गुरुमाई चिद्विलासानंद

भगवंताचे नाम रसाचे, गोडव्याचे, अमृताचे भंडार आहे.
भगवंताचे नाम अत्यंत गोड आणि अत्यंत अमृतमय आहे.
त्याहून अधिक गोड अशी कोणतीही गोष्ट तुम्हाला सापडणार नाही.
जो कोणी नामाचे पान करतो, तो भगवंतासारखाच बनतो.
असा आहे नामाचा महिमा.

~ बाबा मुक्तानंद

दिव्य नाम अदृश्याला दृश्यमान करते,
आणि नामसंकीर्तन केल्याने
दैवी रसाची अनुभूती होते.

~ गुरुमाई चिद्विलासानंद

वास्तवात, ईश्वरच रस आहे.

~ तैत्तिरीयोपनिषद्, २.७.१

संस्कृत भाषेत 'दिव्य'चा अर्थ आहे दैवी किंवा ईश्वरीय, आणि 'सूक्त'चा अर्थ आहे, ते कथन जे सर्वोच्च सत्यावर प्रकाश टाकते. दिव्य सूक्त : ईश्वरविषयक शिकवणी.

©२०२० एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.